# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र. ४७१ दिनांक २६.०५.२०२०

१. फिर्यादी पुरुष वय-३७वर्षे,व्यवसाय-नोकरी रा- डहाणू पुर्व ता-डहाणु जि. पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.१४/०५/२०२० रोजी ११.४५ वाजताचे सुमारास फिर्यादी यांचा भाऊ वय ४१ वर्षे, याने पत्नी आरोपीत क्रमांक १ हिचे आरोपीत क्रमांक २ यांचेत असलेल्या अनैतिक संबंधाला फिर्यादी यांचा मयत भाऊ विरोध करत होता त्यामुळे फिर्यादी यांची आरोपीत क्रमांक १ व २ हे नेहमी त्याचेबरोबर भांडण तंटा करीत होते त्यास कंटाळुन फिर्यादी यांचे मयत भाऊ यास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले म्हणुन **डहाणु पोलीस ठाणे** गु.र.नं. I ११४/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

२. फिर्यादी पुरुष वय-३३ वर्षे रा. वसई गाव प.,ता.वसई,जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि. २४/०५/२०२० रोजी १४.५३ वाजताचे सुमारास आरोपीत यांनी करोना या साथ रोगाचा आधार घेवुन कोणतीही परवानगी अगर कोणाचीही परवानगी न घेता खोडसाळपणे रस्ता बंद केला त्याबाबत फिर्यादी यांनी विचारणा केली त्याचा मनात राग येवुन आरोपीत क्रमांक १ ते ६ यांनी गैरकायद्याची मंडळ जमवुन फिर्यादी व त्याच्या पत्नीस ठाश्याबुक्क्यांनी व लाथांनी मारहाण करून आरोपीत क्रमांक १ याने फिर्यादीच्या कानशिल्यात जोरदार मारल्याने त्यास आपखुषिने दुखापत केली म्हणुन **वसई पोलीस ठाणे** गु.र.नं. I २३५/२०२० भा.दं.वि.सं.कलम १४१, १४७, १४९, १४३, ३२३, ३२४, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यांना दिनांक २५/०५/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

३. फिर्यादी पुरुष वय-२८ वर्षे, धंदा-शेती रा.बोईसर ता.जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दिनांक २४.०५.२०२० रोजी ०३.३० वाजताचे सुमारास फिर्यादी हे घरी असतांना आरोपीत क्रमांक १ ते ५ यांनी दोन दिवसापुर्वी दारु पिण्याच्या कारणावरुन झालेल्या भाडणांचा राग मनात धरून बेकायदेशीरपणे एकत्र येवुन फिर्यादी यास मारहाण केली तसेच फिर्यादी यांची पत्नी व मुलगी असे दोघींना ढकलुन दिल्याने त्या दोघी जमीनीवर पडुन त्यांना किरकोळ दुखापत झाली म्हणुन **बोईसर पोलीस ठाणे** गु.र.नं. I १८०/२०२० भा.दं.वि.सं.कलम १४३, १४७, १४९, ३२३ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

४. फिर्यादी पुरुष वय १८ वर्षे धंदा-शिक्षण रा. नायगाव पुर्व ता.वसई जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.२३/०५/२०२० रोजी सकाळी ०९/.३० वाजता आरोपीत याने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल यमुना नगर येथील गौशाळेजवळ, नायगाव ते हायवे रोड वसई पुर्व या दरम्यान हयगयीने, अविचाराने बेंदरकारपणे भरधाव वेगाने चालवल्याने गाडी स्लीप होवुन झालेल्या अपघातात सदरची मोटारसायकलचे मागे बसलेला त्याचा मित्र वय १८ वर्षे अपघात मध्ये दुखापत होवुन मयत झालेले आहेत म्हणुन **वालीव पोलीस ठाणे** गु.र.नं. I ५५९/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०४(अ),२७९, ३३७,३३८,सह मो.वा.का.कलम-१८४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

५. फिर्यादी मपोशि/ क्रांती नवनाथ दहीफळे नेम- पोलीस मुख्यालय पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि. २५/०५/२०२० रोजी ०९.१५ वा.चे सुमारास आरोपीत ही रस्त्याचे कडेला फुथपाथवर तोंडाला माक्स न लावता कपडे विकीत असतांना मिळुन आल्याने सदर महिलेने मा जिल्हाधिकारी साो, पालघर यांचे मनाई आदेशाचा भंग केला कैला म्हणुन **तुळींज पोलीस ठाणे** गु.र.नं. ाा ५२८/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

६. फिर्यादी पोना/मुरलीधर भिकन पाटील, नेम- तुळींज पोलीस ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दि. २५/०५/२०२० रोजी ९.०० वा सुमारास आरोपीत यांनी त्यांच्या मालकीचे नंदा कापड दुकान हे लॉकडावुन मध्ये परवांगी नसताना उघडुन चालु ठेवुन मा.जिल्हा अधिकारी साो,पालघर यांचे आदेशाचा भंग केला म्हणुन **तुळींज पोलीस ठाणे** गु.र.नं. ाा ५२९/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

७. फिर्यादी पोशि/सुखराम दिलीप गडाख, नेम- तुळींज पोलीस ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दि. २५/०५/२०२० रोजी ९.३० वाजताचे सुमारास आरोपीत यांनी त्यांच्या मालकीचे हिटलर मेन्स वेअर हे लॉकडावुन मध्ये परवानगी नसतांना उघडुन चालु ठेवुन मा.जिल्हा अधिकारी साो, पालघर यांचे आदेशाचा भंग केला म्हणुन **तुळींज पोलीस ठाणे** गु.र.नं. ाा ५३०/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

८. फिर्यादी पोशि/ ७३० संतोष गोरक्षनाथ मस्के, वसई पोलीस ठाणे यांनी फिर्याद दिली की, दि.२५/०५/२०२० रोजी २०.०० वाजताचे दरम्यान आरोपीत क्रमांक १ ते ६ यांनी कोरोना या साथ रोगाचा प्रसार होवु नये यास्तव मा. जिल्हाधिकारी साो. पालघर व आयुक्त व. वि. श. म. न. पा. यांनी सायंकाळी ७.०० ते सकाळी ७.०० वा. च्या दरम्यान कोणतीही आस्थापने (दुकाने) उघडे ठेवु नये यास्तव मनाई आदेश केला असता आदेशाचा भंग करुन कोरोना या साथ रोगाचा प्रसार होईल हे ज्ञात असतानाही आप आपली दुकाने उघडे ठेवली म्हणुन **वसई पोलीस ठाणे** गु.र.नं. ाा २३६/२०२० भा.दं.वि.सं.कलम २६९, १८८ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.